Sakal, Pune, 03.10.13, pg. 3

# 'फलज्योतिष ही 'इम्पोर्टेड' अंधश्रद्धा'

**पुणे, ता. २ :** "सध्या फोफावलेल्या फलज्योतिषाचा वैदिक काळात आपल्याकडे मागमूसही नव्हता. मात्र, अलेक्झांडरच्या भारतावरील स्वारीच्या वेळी त्याच्यासोबत आलेल्या काही विद्वानांनी फलज्योतिषाचे विचार मांडले. ते 'विचार आजही कायम असून, त्यात दिवसेंदिवस भर घातली जात आहे. त्यामुळे फलज्योतिष ही आयात केलेली अंधश्रद्धा आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी बुधवारी केले.

'आईज ऑन आयसॉन' महाराष्ट्र व्यासपीठातर्फे आयोजित आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना समर्पित 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते. या वेळी डॉ. अनंत फडके, प्रा. पुष्पा भावे आणि 'साधना'चे संपादक विनोद शिरसाट उपस्थित होते.



डॉ. नारळीकर

डॉ. नारळीकर म्हणाले, "डॉ. दाभोलकर यांची कार्यपद्धती वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारलेली होती. प्रत्येक गोष्टीचा कार्यकारणभाव समजून घेऊन अंधश्रद्धा निर्मूलनासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. तथाकथित बाबांकडून आश्चर्यकारक शक्तीचा दावा केला जातो. मात्र त्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन पडताळून पाहण्याची आवश्यकता असते."

शिरसाट म्हणाले, "प्रसारमाध्यमांतील काही अडचणींमुळे बऱ्याचदा वैज्ञानिक विचारांचा बारकाईने अभ्यास केला जात नाही. अनेक पत्रकारांची शैक्षणिक पार्श्वभूमी विज्ञानाची नसल्याने त्यावर फारसे लेखनही होत नाही. मात्र, विज्ञानाचा प्रसार करण्यासाठी माध्यमांतून प्रयत्न होणे गरजेचे आहे."

वैचारिक पराभव झाल्यानेच डॉ. दाभोलकरांची हत्या झाली. त्यामुळे वैचारिक पातळी वाढणे गरजेचे आहे. त्याबरोबरच मानवी मूल्यांचाही विचार करण्याची गरज असल्याचे भावे म्हणाल्या. डॉ. फडके म्हणाले, "जीवनातील असुरक्षिततेमुळे अंधश्रद्धेला बळी पडण्याचे प्रमाण वाढत आहे. काही जणांनी बुवाबाजी टिकवण्यासाठी देवाच्या नावाखाली बाजार मांडला आहे. तो थांबवण्यासाठी विज्ञानाची कास धरून पुढे जावे लागेल." डॉ. प्रियदर्शिनी कर्वे यांनी सूत्रसंचालन केले.

चला, मध्यप्रदेश!

धम्माल पॅकेजेस
आकर्षक कमी किंमतीत!
मध्यप्रदेश टूरिझम
६, भोसले शिंदे आर्केड, जंगली महाराज रोड, डेक्कन, पुणे ४. फोन: २५५३४००७ मो.: ९३२३१२२१६९